पोलीस सह आयुक्त, वाहतूक, मुंबई.

# वार्तापत्र

मुंबई वाहतूक नियंत्रण शाखेस ई-बाईकस् चालक विशेषत: डिलेव्हरी बॉईज वाहतूकीच्या नियमांचा भंग करीत असल्याच्या मोठया प्रमाणात तक्रारी नागरिकांकडून प्राप्त होत आहेत. ई-बाईकस् चालक वाहतूक नियमांचा भंग करून स्वत:च्या तसेच इतरांच्या जिवीतास धोका निर्माण करित आहेत. त्या अनुषंगाने बेशिस्त ई-बाईक चालकांना प्रतिबंध करण्यासाठी व त्यांना वाहतूकीची शिस्त लागावी म्हणून विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे.

दिनांक १८/१२/२०२४ ते दिनांक २९/१२/२०२४ रोजी पर्यंत विशेष मोहिमेदरम्यान वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ई-बाईक चालकांवर भा.न्या.सं. अन्वये १८१ गुन्हे, स्थानिक गुन्हे (LAC)-१९६३ दाखल करून एकुण ६७२ ई-बाईकस् जप्त करण्यात आल्या आहेत. तसेच मोटार वाहन कायदयान्वये १८० डिलेव्हरी करणाऱ्या दुचाकी वाहनावर ई-चलान कारवाई करण्यात आलेली आहे.

तरी नागरिकांनी अशाप्रकारे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणारे ई-बाईकस् चालक व डिलेव्हरी बॉईज् आढळून आल्यास मुंबई वाहतूक नियंत्रण शाखेच्या हेल्पलाईनवर तक्रार करावी.